# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे

## "मंदा कदम यांचा स्थूल जीवनपरिचय"

दुसऱ्या प्रकरणात आपण कवयित्री मंदा कदम याचा जीवन परिचय करुन घेणार आहोत. मंदा कदम या भावकवयित्री म्हणून सर्व परिचीत असल्याने त्यांच्या काव्याचे स्वरुप शोधताना आपणास कवयित्री म्हणून त्यांची झालेली जडणघडण आणि काव्यविषयकदृष्टी समजून घ्यावयाची आहे.

कोणताही व्यक्ती सर्वप्रथम माणूस असतो. सर्वसामान्य माणसाप्रमाणे सुखदु:खाशी त्याला संघर्ष करावा लागतो. त्यातून त्याची जीवनविषयक दृष्टी विकसीत होते. जीवनात येणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभवातून त्याच्या विचारधारणा ठरत जातात. असे असले तरी सर्वसामान्य माणूस आणि कलावंत यांच्यात जाणीव-नेणिवांच्या, संवेदनशीलतेच्या पातळीवर भेद असतो. एखाद्या घटनेचा जितका खोलवर परिणाम कलावंतांच्या मनावर होईल तितका सर्वसामान्य व्यक्तीच्या मनावर होईलच असे नाही. कलावंतांच्या या वेगळ्या भाववृत्तीमुळेच तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो.

कलावंताच्या व्यक्तित्वाचा त्याच्या कलाकृतीशी घनिष्ठ संबंध असतो. त्याच्या विचारांची, जाणिवांची, भाव-भावनांची प्रतिबिंबे त्यांच्या कलाकृतीत उमटतात. त्याचप्रमाणे त्यांची जीवनदृष्टी आणि काव्यविषयक दृष्टी व्यक्त होते. मंदा कदम यांच्या कवितांचा अभ्यास करताना त्याच्या व्यक्तिगत जीवनाचा परिचय अत्यावश्यक आहे.

मंदा कदम यांचे संपूर्ण नांव मंदाकिनी नानासाहेब कदम. यांचा जन्म ४ जून १९४२ रोजी झााल. त्यांच्या वडिलांना 'दादा' असे म्हणत असत. लहानपणासून त्यांना वाचनाची अत्यंत आवड होती. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या, लक्ष्मीबाई टिळकांची सृतीचित्रे, रामायण, ज्ञानेश्वरी, भगवद्‌गीता यासारखे पौराणिक आणि अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन त्यांनी केले होते. रविंद्रनाथ, बकिमचंद्र, शरदचंद्र, चटोपाध्याय इत्यादींची कितीतरी पुस्तके त्यांच्या संग्रही होती. तसेच चांगल्या कविता, आवडलेले विचार, वर्णने लिहून ठेवण्याची त्यांना आवड होती. काव्यावर प्रेम करणारे, वाचनाचे वेड जाणणारे, रसिक होते. त्यांच्या वडिलांमध्ये असणारे हे गुण कवयित्रीमध्ये स्पष्टपणे जाणवतात

मंदा कदम यांचे प्राथमिक शिक्षण १९५७ साली झाले. १९६२ ला विज्ञान शाखेच्या पदवीधार झाल्या तर १९६४ मध्ये त्यांनी एम. ए. पूर्ण केले. तत्पूर्वीच महाविद्यालयात असताना

त्यांची कवित्व शक्ती जागृत झाली असून त्या कविता लिहू लागल्या होत्या. कविता करण्याची स्फुर्ती त्यांना घरातील प्रसन्न वातावरणामुळे झाली असावी. कारण वडिलांना वाचनाची आवड, कविता करण्याचा छंद होता तर आजीला अनेक गाणी, ओव्या येत असत. ती स्वतः रचून म्हणत असे. मग एखाद्या दिवशी गाण्यांच्या भेंड्या लागत. त्यासाठी कवयित्रीला पाठांतर करणे आवश्यक वाटे. इतकेच नव्हे तर कवितेतील प्रसंग डोळ्यापुढे उभे करायला आवडत असे. कविता वाचायची, पाठ करायची, सतत म्हणत राहायची याचा त्यांना छंद लागून रहायचा. त्यातून त्यांना कविता लिहण्याची स्फुर्ती आली असावी.

'मंदा कदम यांचे घर गोकुळासारखे होते. वडिलांच्या व आजीच्या संस्कारात सर्व भावंड वाढली होती. एकमेकांबद्दल दुरावा, मत्सर, द्वेष, यासारख्या गोष्टींना घरामध्ये थाराच नसे. हिश्रूत, संस्कारक्षम, बुध्दीमान आजी असल्यामुळे तिची भाषा शुध्द, मधुन असे. शुध्द भाषेचा संस्कार हा आम्हाला लाभलेला एक दैवयोगच हाता असे कवयित्री म्हणत.'[१] घरामध्ये सणवार, पूजाअर्चा, व्रतवैकल्य नित्यनियमाने असत त्यामुळे वातावरण प्रसन्न असे. या सर्व घटकांचा प्रत्यक्षपणे परिणाम कवयित्रीवर होत असे. त्यामुळे त्यांच्या कवीमनाची जडण घडण उत्तमरीतीने झाली. तसे पाहिले तर प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीवर कोणाचातरी प्रभाव असतोच. आजूबाजूच्या वातारणात माणूस वावरतो, वाढतो, जगतो या वातावरणाचा क्रिया: प्रतिक्रियांचा आणि भेटणाऱ्या अगणित व्यक्तींचा परिणाम मानवी मनावर होतच असतो. कवी व लेखक यांचे वाचन, मनन, चिंतन त्यांचे विचार आणि व्यक्तिमत्व घडविण्यास कारणीभूत ठरतात. चंदणाचे देणे हा काव्यसंग्रह याचे उत्तम उदाहरण ठरेल.

मंदा कदम ह्या जवळजवळ ३६ वर्षे मराठीच्या अध्यापिका म्हणून कार्यरत हात्या. न्यू कॉलेज कोल्हापूर येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून २९ वर्षे सेवा केली. शिक्षक बनणे हेच त्यांचे ध्येय होते. अध्ययन, चिंतन, मनन, हे गुण त्यांच्या ठायी प्रखरतेने दिसून येतात. त्या एक कलावंत आहेत. संगीत, विणकाम, चित्रकला, शिल्पकलेमध्ये त्या निष्णात आाहेत.

विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यात मला खूप आवडते. ते करताना मी कधी थांबत नाही न कधील थकत असे त्या सांगतात. यावरुन त्यांची जिज्ञासा व विद्यार्थ्यावरचे प्रेम दिसून येते. 'अलिकडच्या काळात विद्यार्थ्यांमधून दिसून येणारी उदासिनता, रुक्षता आणि व्यावहारिकता पहात असताना कवयित्रीने जड वि. श्वास टाकले. भावभावनांनी संपन्न झालेले मन हेच खरं वैभव आहे. असे त्यांचे मन आहे. मुलांच्या जडणघडणीत पालकांचा मोटा हात असतो. त्याचबरोबर शिक्षकांचाही सहभाग

असतो याची जाण त्यांना होती म्हणून मुलं लहान असतानाच त्यांना रंगाची, गंधाची, रसवत्तेची जाणीव करुन घ्यायला हवी. जीवनातील सौकुमार्य दाखवायला हवं. असं त्यांना वेळोवेळी वाटतं.'[१२]

कवयित्री मंदा कदम यांचा पहिला काव्य संग्रह १९९१ मध्ये प्रकाशित झाला. यामध्ये जवळपास १० ते १२ वर्षे पूर्वी लिहिलेल्या कविता समाविष्ठ आहेत. या काव्यसंग्रहातील कवितांनी रसिकमनाला मोहिनी घातली आहे. निसर्गप्रतिमांच्या अंगाने प्रकटणारी स्त्रीमनाची भावस्पंदने निसर्गचित्राच्या साहाय्याने अधिक हृदयगत होतात. त्यामुळे रसिकांच्या नाजुक भावनांना स्पर्श करतात व प्रीतीचा अनुभव देवून जातात.

'रेशीमनातं', मी अशी बहरले, प्रतिमा , मेघदूत, निदान, मौन बावरा एकांत, रस्ता, एका उमलत्या क्षणी, कातरवेळ, अशी शिर्षके असलेल्या कवितांमधून एका विरही-व्याकुळ स्त्रीमनाच्या भावछटांचे वेगवेगळे पैलू दिसतात. हेच कातरवेळचे महत्वपूर्ण असे वैशिष्ट्य आहे.

साजणवेळा या दुसऱ्या काव्यसंग्रहामध्ये अलिकडे दुर्मिळ होत चाललेल्या हळूवार, नाजूक, भावनांची स्पंदने तरलपणे जी सर्वत्र जाणवतात त्यांचे चित्रण केले आहे. साजणवेळामधील कविता ही नायिकाप्रधान आहे. नायिकेच्या अंतरीच्या भावनांची ही तरल, हळवी स्पंदने आहेत. आणि ती मुख्यत: साजण आणि निसर्गविषयक आहेत हे इथे महत्वाचे आहे.

'चंदनाचे देणे' हा काव्यसंग्रह म्हणजे कवयित्रीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करणाऱ्या, त्यांच्यावर संस्कारांचे, मायेचे पांघरुन घालणाऱ्या आजीच्या आठवणींच्या कविता आहेत. कवयित्रीने आपल्या आजीच्या स्वभावातील दया, क्षमा, शांती, समाधान असे अनेक गुणविशेष अधिक तन्मयतेने सांगितले आहेत.

'ऋतुनाद' हा मंदा कदम यांचा चौथा काव्यसंग्रह. यामध्ये अंतकरणाच्या खोल गाभाऱ्यातून निर्माण झालेली कविता आहे. पाऊसधारा, हिमवंती, निसर्गराजा अशा स्वतंत्र तीन शिर्षकाखाली काव्यसंग्रहाची मांडणी करण्यात आली आहे. बालपणापासून अनुभवलेल्या पावसाच्या काळातील आठवणी ऋतुनादमध्ये त्यांनी बंदिस्त केल्या आहेत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कवीवर्य कुसमाग्रज स्मरणार्थ दिला जाणारा 'विशाखा' पुरस्कार 'कातरवेळला' तर जगद्गुरु तुकोबाराय साहित्य पुरस्कार (मुंबई) 'साजणवेळा' या कवितासंग्रहास मिळाला. राधानगरी येथील सहाव्या ग्रामीण साहित्य संमेलनात 'चंदनाचे देणे' या मंदा कदम यांच्या दीर्घकाव्यसंग्रहास 'विशेष ग्रंथ' पुरस्कार मिळाला तर

'ऋतुनादला' तांबटकाळा वाचनालय कोल्हापूर यांचा साहित्य पुरस्कार मिळाला. याशिवाय 'जित्राब' हा ग्रामीण कवितांचा संग्रह (संपा), तर 'गंधवीणा' हा ललितलखसंग्रह प्रसिध्द आहे.

मंदा कदम यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू असा आह. जीवन हे मानवाला मिळालेली परमेश्वराची देणगी आहे, तेंव्हा जीवनातील सौंदर्याचा शोध घेणे त्यांचा निजीध्यास असल्यामुळे जगातील डावपेचांच्या वागणुकीशी त्यांचे जुळत नाही. त्यांच्यात स्वातंत्र्य, स्वावलंबन, प्रेमळपणा व व कुशाग्र बुध्दित्व हे गुण स्पष्ट दिसतात. त्यामुळे सृष्टीतील सौंदर्य व जीवनातील सौंदर्य यामध्ये त्या रंगून गेलेल्या दिसतात.

निसर्गाची त्यांना अनिवार ओढ आहे. जे जे सुदर आहे त्या त्या सुदरतेचा शोध घेण्याची वृती त्यांच्या ठायी आहे. हा त्यांचा स्वभावातील विशेष गुण तत्काळ दिसून येतो.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव या संतकवींविषयी त्यांच्या मनात प्रीत आहे. इंग्लीश कवी वर्डस्वर्थ, हिंदी कवयित्री महादेवी वर्मा तसेच सुमित्रानंदन पंत त्यांना विशेष आवडतात. त्यांच्या काव्याचा सुक्ष्मपणे व तितक्याच बारकाव्याने त्यांनी अभ्यास केला आहे. रवींद्रनाथ टागोरांची 'गितांजली' त्यांनी अभ्यासली व ती त्यांना खुप आवडली होती.

प्रसिध्द मराठी कवी बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर, विंदा करंदीकर, कवी कुसमाग्रज या कवींविषयी त्यांना लोभ आहे. आवडीचे आहेत. त्यामुळे साहजिकच ह्यांच्या समग्र साहित्याचा परिणाम कवयित्रीच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत झाला असावा. त्यांचे समग्र वाङ:मय त्यांनी अभ्यासले असावे. त्यांचे चरित्रही अभ्यासले असावे त्यामुळे त्यांच्या प्रतिभेचा आदर्श त्यांनी आपल्या साहित्यिक वाटचालीत समोर ठेवला असावा. पहा -:

'रवींद्रनाथ टागोर आणि बा. भ. बोरकर दोघेही निसर्गात मनसोक्तपणे रममाण होतात. दोघांच्याही संवेदनानिष्ठ मनांनी निसर्ग पाहिला, टिपला आणि आपल्या काव्यात अविष्कृत केला. दोघेही विलक्षण वृत्तीचे होते. मानवी जीवनाविषयी त्यांना अपरंपार प्रेम होते. आणि म्हणूनच ते दोघेही उत्कृष्ठ निसर्ग काव्य लिहू शकले. मानवी मनाच्या नैसर्गिक भावभावंना आणि निसर्ग यांच्यातील अतूट नाते ते ओळखू शकले.'[३]

मंगेश पाडगांवकर, करंदीकर, कुसुमाग्रज यांनीही जीवनातील सौंदर्याचा शोध घेताना निसर्गाला सोबती केले आहे म्हणून 'निसर्ग माझ्या अनुभवांपासून वेगळा नाही, वेगळा करता येणार नाही' असे पाडगांवकर म्हणतात.'[४]

एकंदर मंदा कदम यांच्या असलेल्या जीवनदृष्टीत याचा प्रत्यय आपणाला येतो. त्यामुळे कवयित्रीच्या वाङ:मयीन व्यक्तीमत्वात या कवींना अग्रस्थान आहे. तर ना. धों. महानोर यांना मंदा कदम यांचे सर्व संग्रह आवडतात. 'साजणवेळा' हा काव्यसंग्रह जेष्ट साहित्यिक शिवाजी सावंत यांना खूप आवडतो असे त्यांनी पत्राने कळविले होते.

कवीवर्य कृ. ब. निकुम्ब, डॉ. सरोजनी बाबर, रा. भी जोशी यांच्याशी त्यांचा पत्र रुपाने होणारा संवाद कवयित्रीला खूप आवडतो. या सर्व प्रतिभासंपन्न कवींविषयी, साहित्यिकांविषयी मंदाताई आज खूप अभिमानाने आणि आनंदाने बोलतात.

खरं तर कवयित्रीला ज्यांचा ज्यांचा सहवास लाभला त्यांचाही फार मोटा वाटा त्यांच्या जीवनाच्या जडणघडणीत तर महत्वाचा आहेच पण साहित्यक घडणीतही तितकाच महत्वाचा आहे. विशेषत: कवीवर्य सुधांशु. कवयित्री सांगते,

त्यांची माझी अनपेक्षितपणे प्रत्यक्ष ओळख झाली. त्यांच्या पूर्वी त्यांना मी दुरुन ओळखत होते पण प्रत्यक्ष भेटीत मायेचे, ममतेचे साक्षात रुप मला अनुभवण्यास मिळाले. मग कवयित्रीचे एखादे भाषण, अथवा लेख परीक्षण करुन कविवर्य सुधांशुंनी त्यांना वारंवार काव्यलेखनास उत्तेजन दिले.

कविवर्य कृ. ब. निकुम्ब यांच्या स्नेहाचा तर कवयित्रीला फारच फायदा झाला. बेळगांवला भरणार असलेल्या साहित्यसंम्मेलनाचे अध्यक्षपद कृ. ब. निकुम्ब यांच्याकडे होते. तर कार्यक्रमाचे संयोजन कवयित्रीकडे होते. त्यामुळे या संमेलनात कृ. ब. निकुम्ब ना भेटण्याचा योग कवयित्रीला आला. तिथे कवयित्रीने काही अध्यात्मिक वळणाच्या कविता वाचल्या त्यावर कविवर्य त्यांना लगेच म्हणाले,

'आपण एकदा आपल्या कविता
एकत्र वाचायला द्याव्यात'

त्यांच्या या सल्ल्यामुळे कवयित्री सांगते, माझ्यासारख्या एंका नवोदित, शब्दखेळ करणाऱ्या मुलीच्या अंगावर मुठभर मास चढले. त्यांच्या लेखनाला अधिक हुरुप आला. कवयित्री म्हणते,

लेखणीवर ऋण असते ते अशा आशीर्वादांचे, संत वाङ:मय वाचताना नेहमी संतमुर्ती अमूर्तच असतात. पण का कोण जाणे अशा वेळी मला त्या अमुर्ततेलाच एखादा सौहार्दपूर्ण,

सौजन्यशील, परमशांतीमय आकार मिळाल्याचा भासही होतो. तो आकार ते रुप कविवर्य निकुम्बांचे असते.'[५]

द.म.सा संमेलन पहिले कोल्हापूर येथे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या संमेलनातील कविसंमेलनाच्या अध्यक्षा डॉ. सरोजनी बाबर होत्या.

कवयित्री सांगते की, केशवराव भोसले नाट्यगृहातील मागील बाजुला असलेल्या बैठकव्यवस्थेकडे डॉ. सरोजनी बाबर आल्या आणि कुण्या जन्माची ओळख असल्यासारख्या माझ्याकडे बघून हसल्या. माझे नांव त्यांनी विचारले. कारण त्याच दिवशीच्या पुढारीमध्ये 'जोतिबाच्या नावानं चांगभल' हा कवयित्रीचा लेख प्रसिध्द झाला होता. तो त्यांनी वाचला होता. त्यांनी कवयित्रीशी त्याबाबत चर्चाही केली होती. डॉ. सरोजनी बाबर ह्या लोकगीताच्या अभ्यासक असणाऱ्या लेखिका. त्यांचा आवाज, स्वर मी ऐकला, त्यांचे लाघव मी अनुभवले असे कवयित्री मंदा कदम सांगतात.'[६]

भावविलोभनीय सौंदर्याचा शोध घेणाऱ्या या कवयित्रीच्या कवितांचा विचार करता मंदा कदम यांची बालकवींप्रमाणे स्वच्छंदवृत्ती आहे. निसर्गाची अत्यंतिक ओढ आहे. त्यात रममाण होतात. त्यांच्या काही कवितांतून गोविंदाग्रजांप्रमाणे प्रीतीचा अविष्कार झालेला आहे. माणूस आणि प्राणी, माणूस आणि सृष्टी यांच्यातील नाते शोधताना त्या दिसतात.

२३०५/६ कलाप्रसाद, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ कोल्हापूर इथे त्या सध्या रहात आहेत. हे ठिकाण पंचगंगा नदीच्या अगदी जवळच आहे. सुसज्ज इमारत, प्रशस्त खोल्या, भिंतीवर निसर्गाचे भलेमोठे फोटो, खोलीच्या चारही कोपऱ्यात विविध प्रकारच्या झाडांच्या, फुलांच्या कुंड्या आहेत. टेबलावर सतत दोन-तीन वर्तमानपत्रे, मासिक, साप्ताहिके पडलेली असतात. त्यामुळे घरामध्ये प्रसन्नतेचा, शांततेचा अनुभव येतो तर कवयित्रीचे निसर्गप्रेम चटकन मन वेधून घेते. इमारतीच्या गच्चीवरुन पंचगंगा नदीच्या सभोवताली पसरलेला हिरवागार प्रदेश, पाण्याचा धीरगंभीर असा प्रवाह, पलीकडे सहज नजर फिरवल्यास पन्हाळ्याचा निसर्गरम्य परिसर, डोंगराच्या विस्तीर्ण कडा दिसतात. त्याचा त्यांनी आपल्या प्रसन्नतेसाठी उपयोग तर करुन घेतलाच पण त्याचबरोबर त्यांना कवितेच्या स्फुरतेसाठी उपयोग झाला.

घरामध्ये प्रवेश करताच आपण सतत इकडून तिकडे फिरणारे, सतत पायात घटमळणारे मांजर दिसते. कवयित्री नेहमी त्यांच्याशी संवाद करते. खिडकीच्या लगतच भांड्यामध्ये पावाचे तुकडे व पाणी ठेवलेले दिसते. राघू, चिमण्या, हे पक्षी तिथे येतात. या पक्षांशी, प्राण्यांशी संवाद करण्यात

कवयित्रीला विलोभनीय आनंद वाटतो. तर खिडकीतून आत डोकावणाऱ्या वेलींशी, पानांशी, फुलांशी त्या सतत बोलतात. त्यामुळे त्या मानव आणि सृष्टी यांच्यातील नाते शोधताना दिसता असे वाटते. हे नाते शोधताना मात्र त्यांना माणसाची अपूर्णता लक्षात येते आणि सृष्टीचे अखंड चालणारे चक्रही लक्षात येते.

आधुनिक मराठी कवितेचा विचार करताना कवयित्री मंदा कदम यांच्या मराठी कवितेतील वेगळा ठसा चटकन लक्षात येतो. मराठी संत साहित्य, पाश्चात्य कवी, लेखक, हिंदी कवी-कवयित्री यांचे अभ्यासपूर्ण चिंतन, मनन केल्याचे स्पष्टपणे जाणवते तसेच त्यांच्या कवितातून, ललित निबंधातून अनेक वाङ:मयीन व्यक्तिमत्वे येताना दिसतात. याचाच अर्थ त्यांच्यावर या व्यक्तींचा, व्यक्तिमत्वाचा, लेखनाचा, विचारांचा परिणाम झालेला आह.

'पु. ल. देशपांडे, शंकरराव खरात, बहिणाबाई चौधरी, कवी सुधांशू, कवीवर्य कृ. ब. निकुम्ब, डॉ. सरोजनी बाबर, श्री. रा. भी. जोशी, प्रा. चंद्रकुमार नलगे, कवी ना. धो. महानोर यांचे उल्लेख येतात. याशिवाय पौराणिक ग्रंथ, रामायण, भगवद्‌गीता यांचाही खूप प्रभाव त्यांच्यावर आहे. कारण त्यातील व्यक्तींचे संदर्भ कवितांतून वहूलतेने येतात.' त्यांच्या भावविश्वात असणाऱ्या सर्व व्यक्तींचे दर्शन त्यांनी आपणाला घडविले आहे.

कवयित्री मंदा कदम यांची विचारसरणी आणि प्रतिभाशक्ती समृध्द, सुसंस्कृत आहे. त्यांच्या सर्व काव्यसंग्रहांचा सुक्ष्मपणे अभ्यास केला असता असे जाणवते की, त्यांची जीवनदृष्टी अत्यंत सरळ आहे.

जीवनातील सौंदर्याचा शोध घेणे, संगीताची असणारी गोडी, प्रीतीची विलक्षण ओढ, सतत गुणगुणने ही त्यांची काव्य व स्वभाववैशिष्ट्ये त्यांची जीवनदृष्टी ठरवितात. सौंदर्याचा शोध घेणे हा त्यांच्या लेखनाचा पाण आहे. आणि काव्यलेखनासाठी लागणारे हळुवार मन आणि तरल संवेदना हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष आहेत.

## सारांश :

कवयित्री मंदा कदम यांचा जीवनपरिचय आपण या प्रकरणात करुन घेतला आहे. सुसंस्कारक्षम अशा घरामध्ये वाढलेल्या कवयित्रीच्या मनावर घरामध्ये चालणाऱ्या घटनांचे विविधांगी विलक्षण असे प्रभाव झाले. त्यांच्या मनावर संतवाङ:मयाचे, पौराणिक वाङ:मयाचे खोलवर परिणाम झाले कारण्या त्यांच्या घरातच त्या वाङ:मयाचा वावर होता. भूपाळ्या, स्तोत्रे.

श्लोक, करुणाष्टके, केकावली, शिवलीलामृत, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा असे सतत त्यांच्या कानावरपडत असे. लहानपणी घरात चालत असलेले संत वाङ:मयाचे जाणीवपूर्वक केलेले वाचन त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला आणि काव्यालाही एकप्रकारचे समृध्द तेज प्राप्त झालेले असावे आणि याला कारणही कवयित्रीला लाभलेली अत्युत्कट अशा संवेदनशील मनाची जोड असावी. म्हणूनच त्यांची काव्यदृष्टी वेगळीच बनली.

सौंदर्याचा शोध घेणे हा त्यांच्या मनोधर्माचा मुख्य पिंड अथवा हेतू असला तरीही कवयित्री निसर्गावर भरभरुन प्रेम करते. अत्यंत मनमिळावूपणा असल्यामुळे निसर्गाबरोबर मानवी जीवनातील सौंदर्याचा त्या शोध घेतात.

या प्रकरणावर या बरोबरच कवयित्री मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजाणवेळ, चंदनाचे देणे आणि ॠतुनाद या संग्रहांचा आशय स्पष्ट केला आहे. तसेच कवयित्रीच्या कौटुंबिक जडणघडणीचा परामर्श घेतला आहे.

## संदर्भ

१) हे झाड चंदनाचे - मंदा कदम- हिरण्यकेशी प्रकाशन - प्रस्तावना

२) गंधवीणा - मंदा कदम- हिरण्यकेशी प्रकाशन- १९९२- पृष्ठ-४७

३) मंगेश पाडगांवकर - छोरी (कवितासंग्रह) - मौजे प्रकाशन गिरगांव मुंबई -१९८८ पृष्ठ - १८

४) गंधवीणा - मंदा कदम- हिरण्यकेशी प्रकाशन- पृष्ठ - ४९

५) कविवर्य बा. भ. बोरकर समीक्षा - वासंती मुझुमदार जोशी रुक्मीणी प्रकाश कोल्हापूर - २००४ पृष्ठ २७

६) गंधवीणा - पृष्ट - ५७

७) तत्रैव -पृष्ट - ५८